CMYK

केनवड्या हक्क हिरावून घेऊ देणार नाही!
>> पान 2

आमदार सिद्धार्थ खरात यांचा मुख्यमंत्र्यांना थेट इशारा
>> पान 3

कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे
>> पान 4

सुविचार

वेळेचं महत्त्व ओळखलं की यश जवळ येतं

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 16 ■ शुक्रवार, दि. 31 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या येईल भेटीला, अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी दिली माहिती
आतील पान

# राज्यसभेतही मंजूर झाले अँटी पेपर लीक विधेयक

## ■ पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायद्याचा मार्ग मोकळा
## ■ संसदेच्या पावसाळी अधिवेशनात या विधेयकावर दोन्ही सभागृहांत सविस्तर चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरात गाजलेल्या पेपरफुटी प्रकरणांच्या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारने आणलेले अँटी पेपर लीक विधेयक गुरुवारी राज्यसभेतही आवाजी मतदानाने मंजूर झाले. यापूर्वी हे विधेयक लोकसभेने मंजूर केले होते. दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाल्याने परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा विश्र्वास पुनर्स्थापित करण्यासाठी सरकारच्या महत्त्वाकांक्षी कायद्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात या विधेयकावर दोन्ही सभागृहांत सविस्तर चर्चा झाली. चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये विविध मुद्द्यांवर जोरदार खडाजंगी झाली. मात्र, अखेर राज्यसभेतही हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.




अलिकडच्या काळात विविध स्पर्धा परीक्षा आणि सरकारी भरती परीक्षांमध्ये झालेल्या पेपरफुटी, संघटित गैरप्रकार आणि नकल रॅकेटच्या घटनांचा विचार करून सरकारने कायद्यात कठोर सुधारणा केल्या आहेत. सरकारच्या मते, नव्या तरतुदींमुळे परीक्षा प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्र्वासार्हता वाढेल, दोषींची जबाबदारी निश्र्चित होईल आणि पेपरफुटी करणाऱ्या संघटित टोळ्यांवर प्रभावी कारवाई करता येईल.

विधेयकानुसार पेपरफुटी, नकल रॅकेट चालविणे किंवा परीक्षेत संघटित गैरप्रकार करणाऱ्यांना किमान पाच वर्षे आणि कमाल दहा वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. तसेच दोषींवर मोठ्या आर्थिक दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेत तांत्रिक गैरप्रकार, ऑनलाइन प्रश्र्नपत्रिका प्रसारित करणे, सायबर फसवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)च्या मदतीने कॉपी करणे तसेच परीक्षा प्रणाली हॅक करणे यांसारख्या गुन्ह्यांनाही या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे. परीक्षा घेणाऱ्या संस्था, सेवा पुरवठादार, तांत्रिक कंपन्या किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताचे पुरावे आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांनी या विधेयकाचे स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबतची बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली असल्याचे सांगितले. फास्ट ट्रॅक न्यायालये, कठोर शिक्षा आणि मोठ्या दंडाच्या तरतुदीमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना कठोर संदेश जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सरकारच्या मते, हा कायदा केवळ दोषींना शिक्षा देण्यासाठी नसून भविष्यात पेपरफुटीच्या घटनांना आळा घालणे, परीक्षा व्यवस्थेची शुचिता कायम राखणे आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवरील विश्र्वास अधिक मजबूत करणे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे. आता राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणार आहे.

## भारताला आतून पोकळ करण्यासाठी छुपे युद्ध सुरू- मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई।प्रतिनिधी :** संरक्षण, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत असतानाच, देशाला लढाईत पराभूत करणे शक्य नसल्याने आता शत्रू राष्ट्रांकडून भारताला आतून पोकळ करण्यासाठी एक छुपे युद्ध सुरू करण्यात आले आहे. या षड्यंत्राचा भाग म्हणून देशातील अफाट युवा शक्तीला अमली पदार्थांच्या जाळ्यात ओढून त्यांची दिशा भरकटवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केला.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'ड्रग्ज फ्री मुंबई अभियान २०२६' चा शुभारंभ गुरुवारी वरळी येथील एनएससीआय सरदार वल्लभभाई पटेल स्टेडीयम (डोम) येथे पार पडला. या वेळी हजारो शालेय विद्यार्थ्यांना ड्रग्जमुक्त समाजाची शपथ दिल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई पालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ...तर गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा : अभिजित दिपके, पोलिसांनी दगडांनी भरलेला ट्रक आणल्याचाही आरोप!

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाला बाहेरून निधी मिळाल्याचा आरोप खरा असेल, तर ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे अपयश असून त्यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी कॉक्रोज जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके यांनी गुरुवारी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत केली. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जाचे आदेशही केंद्रीय गृहमंत्रालयातूनच दिले गेले असावेत, असा संशय त्यांनी व्यक्त केला. दिपके यांनी विद्यार्थ्यांवरील लाठीमार, दगडफेक आणि पोलिसांच्या कारवाईबाबत पूर्वनियोजन करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. तसेच १९ तारखेच्या रात्री आणि २० तारखेच्या सकाळी मी स्वतः पाहिले आहे की, पोलिसांनी दगडांनी भरलेला एक ट्रक आणि आधीच तुटलेली एक व्हॅन तिथे आणून ठेवली होती.




दगडफेकीचे नियोजन पोलिस आणि भाजपने मिळून केले होते. याप्रकरणी आपण थेट डीसीपी यांची भेट घेऊन त्यांना जाब विचारला, असेही ते म्हणाले. पोलिसांनी संविधानाचे पालन करावे. जर त्यांना भाजपचेच समर्थन करायचे असेल, तर त्यांनी थेट भाजपच्या मुख्यालयासमोर उभे राहून 'मैं भी चौकीदार' म्हणावे, असा टोलाही त्यांनी लगावला. तसेच त्यांनी भाजपवर केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापराचा आरोप केला.

## नीट आंदोलनात वापरलेल्या आरएएफच्या शस्त्रास्त्रांची नोंद जपून ठेवा, सर्वोच्च न्यायालयाचे सरकारला निर्देश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आंदोलनं अनेकदा चांगल्या हेतूनं केली जातात, मात्र चुकीचा उद्देश आणि तोडफोडीसाठी हायजॅक होण्याचा धोका असतो, त्यासाठी उत्तर देणं गरजेचं असतं, असं सर्वोच्च न्यायलयाने गुरुवारी ३० जुलैला नमूद केलं. सर्वोच्च न्यायालयाने नीट पेपरफुटी प्रकरणात जंतर-मंतरवरील आंदोलक विद्यार्थ्यांवर कथित पद्धतीने पॅलेट गनचा वापर केल्याप्रकरणी सुनावणी करताना केंद्र सरकारला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायलयाने केंद्राला जंतर-मंतरवर तैनात असलेल्या शीघ कृती दलाच्या (ठ-ऋ) दारुगोळ्याचे रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

माजी केंद्रीय माहिती आयुक्त-निवृत्त आयपीएस अधिकारी यशोवर्धन आझाद आणि २ पीडितांनी याचिका दाखल केली होती. याचिकेमध्ये कायदा-सुव्यस्थेचा प्रश्र्न हाताळण्यासाठी पॅलेट गनच्या वापरावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची-व्ही मोहना यांच्या खंडपीठाकडून प्रश्र्न उपस्थित करण्यात आले.

ॲडव्होकेट वृंदा ग्रोवर यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली. तर केंद्र आणि दिल्ली सरकारकडून सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आपला पक्ष ठेवला. खंडपीठाकडून ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च



अँड डेव्हलपमेंट (इझठऊ) च्या सूचनेचा संदर्भ देण्यात आला. तसेच खंडपीठाकडून पोलिसांना विशेष परिस्थितीत पॅलेट गन वापरण्याचा अधिकार असल्याचं नमूद करण्यात आलं.

त्यानुसार, नागरिकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पॅलेट गनवर बंदी घालण्याची याचिका 'अस्पष्ट' असल्याचं नमूद करण्यात आलं. तसेच ही याचिका पॅलेट गनच्या वापरासाठी परवानगी देणाऱ्या पोलीस नियमांना आव्हान देण्यात अपयशी ठरल्याचं खंडपीठानं सांगितलं. तसेच पॅलेट गनच्या वापरावर संपूर्ण बंदी घालण्याची मागणी योग्य नसल्याचंही खंडपीठाने स्पष्ट केलं.

**दिल्ली सरकारला निर्देश काय? :** एखाद्या विशिष्ट घटनेत पॅलेट गन वापराच्या वैधतेची चौकशी केली जाऊ शकते, असं खंडपीठाने सांगितलं. तसेच पॅलेट गनमुळे कथित पद्धतीने जखमी झालेल्यांना वैद्यकीय सेवा पुरवण्याचे आदेश न्यायलयाने दिल्ली सरकारला दिलेत.


## दिल्ली सरकारचा मोठा निर्णय; 'नीट' पेपरफुटी विरोधातील आंदोलकांवरील गुन्हे मागे

### गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांवरील कारवाई सुरुच राहणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** NEET (UG) परीक्षेतील कथित घोटाळ्याविरोधात झालेल्या आंदोलनातील सहभागींवर दाखल केलेले खटले मागे घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिल्ली सरकारने घेतला आहे. मात्र, ज्या आंदोलकांची गुन्हेगारी पार्श्र्वभूमी आहे, त्यांना या निर्णयातून कोणताही दिलासा मिळणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. दिल्लीच्या उपराज्यपालांच्या मंजुरीनंतर गृहविभागाने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले आहेत.

२० जुलै रोजी 'कॉकरोच जनता पार्टी' तर्फे जंतर-मंतरवरून आयोजित करण्यात आलेल्या चलो संसद मार्चदरम्यान झालेल्या हिंसेप्रकरणी दिल्ली पोलिसांनी एकूण १३ गुन्हे दाखल केले होते. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी २,८७३ जणांची ओळख पटवली होती, ज्यांच्यावर पोलिसांवर हल्ला करणे आणि वाहनांची तोडफोड केल्याचा आरोप आहे.

दिल्ली सरकारच्या गृहविभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ज्यांच्यावर आधीपासून गंभीर गुन्हे दाखल नाहीत, अशा सामान्य आंदोलक व विद्यार्थ्यांवर कोणतीही दंडात्मक किंवा कायदेशीर कारवाई केली जाणार नाही. ज्यांना ताब्यात घेण्यात आले आहे, त्यांच्या




सुटकेची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाईल. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, गुन्हेगारी इतिहास असणाऱ्या व्यक्तींना या संरक्षणाचा लाभ मिळणार नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ओळख पटवलेल्या २,८७३ जणांपैकी ९८९ जण सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर हत्या, दरोडा, लैंगिक अत्याचार, अपहरण, आणि अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत आधीच गंभीर गुन्हे दाखल आहेत.

**आंदोलनाची पार्श्वभूमी आणि इतर राज्यांचे निर्णय**

NEET परीक्षा रद्द झाल्यानंतर देशभरात संतापाची लाट पसरली होती. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची आणि परीक्षा पद्धतीत सुधारणांची मागणी करत हे आंदोलन पेटले होते. केंद्र सरकार आणि आंदोलकांच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर तत्कालीन शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा व सुधारणा समितीची स्थापना यांसारख्या मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या.यापूर्वी बिहार आणि आसाम या एनडीएशासित राज्यांनीही आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची घोषणा केली आहे. दरम्यान, सीजेपी आणि विद्यार्थी संघटनांनी सर्व आंदोलकांवरील गुन्हे पूर्णपणे मागे घेण्याची आणि अटक केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची तात्काळ सुटका करण्याची मागणी केली आहे.

## महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासावर भर - मंत्री आदिती तटकरे




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक नागरिकाला उत्तम आरोग्य, पोषण, सुरक्षित मातृत्व, बालकांचा सर्वांगीण विकास आणि महिलांचे सक्षमीकरण सुनिश्र्चित करण्यावर भर देण्यात येत असून सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून शाश्र्वत विकास ध्येयांची विहित कालमर्यादेत प्रभावी पूर्तता करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास विभागामार्फत मंत्रालयात शाश्वत विकास ध्येयांसंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, सन २०३० पर्यंत संयुक्त राष्ट्र संघानी निश्र्चित केलेली शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals-SDGs) प्रभावीपणे साध्य करण्यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध, परिणामकारक आणि समन्वयात्मक पद्धतीने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.



या पार्श्वभूमीवर योजनांची फलनिष्पत्ती वाढविण्यासाठी नियमित मूल्यमापन, प्रभावी अंमलबजावणी आणि परिणामाधारित कार्यपद्धतीवर विशेष भर देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव उपस्थित होते. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या आयुक्त श्रीमती माधवी सरदेशमुख आणि महिला व बालविकास आयुक्त श्रीमती वर्षा लड्डा या दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या. बैठकीत महिला व बालविकास तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित शाश्र्वत विकास ध्येयांतील विविध निर्देशकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राज्याची सद्यस्थिती, राष्ट्रीय स्तरावरील क्रमवारी, विविध योजनांच्या अंमलबजावणीतील प्रगती तसेच सन २०३० पर्यंत निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक महत्त्वाच्या निर्देशकांमध्ये महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या लाभार्थी संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, गर्भवती महिलांमधील निमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. तसेच पाच वर्षांखालील बालकांमधील कुपोषण, कमी वजन आणि बुटकेपणा कमी करण्यासाठी राबविण्यात आलेल्या पोषणविषयक उपक्रमांमुळे समाधानकारक सुधारणा झाल्याचे अद्ययावत आकडेवारीवरून स्पष्ट झाले असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. संस्थात्मक प्रसूती, माता मृत्यू दर आणि पाच वर्षांखालील बालमृत्यू दर या आरोग्यविषयक निर्देशकांमध्ये राज्याने शाश्र्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने समाधानकारक कामगिरी कायम राखली आहे.

याशिवाय महिलांच्या पोषणस्थितीत सुधारणा, कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग आणि मोबाईल फोन वापरणाऱ्या महिलांच्या प्रमाणात झालेली वाढ ही महिला सक्षमीकरणाच्या दिशेने होत असलेल्या सकारात्मक प्रगतीची महत्त्वाची निदर्शके असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आगामी कृती आराखड्याच्या अनुषंगाने सर्व विभागांनी प्रलंबित माहिती विहित मुदतीत अद्ययावत करावी, विविध निर्देशकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यांच्या सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करावा, तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली अधिक सक्षम करून योजनांचे रिअल-टाईम निरीक्षण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश देण्यात आले. आगामी अर्थसंकल्पीय नियोजन हे शाश्र्वत विकास ध्येये आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या विकासदृष्टीशी सुसंगत ठेवण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात शाश्वत विकास ध्येयांशी संबंधित कामगिरीचा महत्त्वाचा कार्यप्रदर्शन निर्देशक म्हणून समावेश करण्याबरोबरच आकांक्षित जिल्हे आणि आकांक्षित तालुक्यांच्या प्रगतीवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचेही निश्चित करण्यात आले.

CMYK

## ज्येष्ठांचा छळ म्हणजे काय?; कुटुंब आणि समाजाची भूमिका

अनेक ज्येष्ठ नागरिक उपेक्षा, मानसिक छळ आणि आर्थिक शोषणाला सामोरे जात आहेत. त्यांचा सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याचा अधिकार जपण्यासाठी कुटुंब, समाज आणि कायदा या तिन्हींची जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. भारतीय संस्कृतीत ज्येष्ठ नागरिकांना कुटुंबाचा आधारस्तंभ, अनुभवाचे भांडार आणि संस्कारांचे विद्यापीठ मानले जाते. त्यांनी आयुष्यभर कुटुंब, समाज आणि देशासाठी दिलेले योगदान अमूल्य आहे; परंतु बदलती जीवनशैली, विभक्त कुटुंब पद्धती, वाढते नागरीकरण, आर्थिक ताण आणि पिढ्यांमधील वाढते अंतर यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक उपेक्षा, मानसिक छळ, आर्थिक शोषण आणि असुरक्षिततेचा सामना करत आहेत. ज्येष्ठांचा छळ हा केवळ कौटुंबिक प्रश्न नाही. तो सामाजिक, आरोग्यविषयक आणि मानवी हक्कांचा गंभीर विषय आहे. अनेक वृद्ध पालक कौटुंबिक प्रतिष्ठा, मुलांवरील प्रेम किंवा कायद्याची माहिती नसल्यामुळे अन्याय मुकाट्याने सहन करतात.अत्याचार म्हणजे केवळ मारहाण नव्हे. मानसिक व भावनिक छळ हा सर्वाधिक आढळणारा प्रकार आहे. सतत अपमान, टोमणे मारणे, बोलणे बंद करणे, घरात एकटे पाडणे, निर्णयांपासून दूर ठेवणे किंवा वृद्धाश्रमात पाठवण्याची धमकी देणे यामुळे वृद्ध व्यक्ती नैराश्य, चिंता आणि आत्मविश्र्वास गमावू शकतात. आर्थिक शोषण हेही वाढते संकट आहे. पेन्शन किंवा बँक खात्यातील पैसे परवानगीशिवाय वापरणे, एटीएम कार्ड किंवा ओटीपीचा गैरवापर करणे, मालमत्ता आपल्या नावावर करून घेण्यासाठी दबाव टाकणे किंवा फसवणूक करणे अशा घटना वाढत आहेत. अनेक ज्येष्ठ प्रेमापोटी आयुष्यभराची कमाई मुलांच्या नावावर करतात आणि नंतर स्वतःच असुरक्षित होतात. वैद्यकीय व शारीरिक उपेक्षा हीदेखील अत्याचाराचीच एक बाजू आहे. वेळेवर अन्न, औषधे, वैद्यकीय उपचार, श्रवणयंत्र किंवा इतर आवश्यक सुविधा न देणे, स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांचे आरोग्य झपाट्याने खालावते. याशिवाय शारीरिक छळ, धक्काबुक्की, मारहाण किंवा अमानुष वागणूक देणे हे गंभीर आणि दंडनीय गुन्हे आहेत. भारतातील 'माता-पिता व ज्येष्ठ नागरिक देखभाल व कल्याण अधिनियम, २००७' हा ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणासाठी महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यानुसार मुलांनी किंवा कायदेशीर वारसांनी आपल्या वृद्ध पालकांच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि औषधोपचाराची जबाबदारी घेणे बंधनकारक आहे. ज्येष्ठ नागरिकांना जलद न्याय मिळावा यासाठी मेंटेनन्स ट्रिब्युनल मार्फत सुनावणीची व्यवस्था आहे. या कायद्यातील कलम २३ विशेष महत्त्वाचे आहे. एखाद्या ज्येष्ठ नागरिकाने देखभालीच्या अटीवर मालमत्ता मुलांच्या किंवा नातेवाईकांच्या नावावर केली आणि त्यांनी नंतर काळजी घेण्यास नकार दिला, तर असे हस्तांतरण न्यायाधिकरण रद्द करू शकते. कलम २४ नुसार ज्येष्ठ नागरिकांना असहाय अवस्थेत सोडणे किंवा त्यांची उपेक्षा करणे हा दंडनीय गुन्हा आहे. याशिवाय जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरणामार्फत मोफत कायदेशीर सल्ला मिळू शकतो. अनेक पोलीस ठाण्यांमध्ये ज्येष्ठ नागरिक कक्ष कार्यरत असून त्यांच्या तक्रारींना प्राधान्य दिले जाते. राष्ट्रीय एल्डर लाईन १४५६७ या टोल-फ्री हेल्पलाईनवर कायदेशीर मार्गदर्शन, मानसिक समुपदेशन, शासकीय योजनांची माहिती आणि आवश्यक मदत उपलब्ध करून दिली जाते. सर्व मालमत्ता आयुष्याच्या सुरुवातीलाच इतरांच्या नावावर करू नये. मृत्युपत्र कायदेशीर सल्ल्याने तयार करावी. बँक व्यवहार, ओटीपी किंवा पासवर्ड कोणालाही सांगू नयेत. नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. ज्येष्ठ नागरिक संघटना, वाचन मंडळे, योग किंवा व्यायाम गटांमध्ये सहभागी व्हावे. ज्येष्ठांना पैशांपेक्षा प्रेम, संवाद आणि सन्मान अधिक महत्त्वाचा वाटतो. दररोज काही वेळ त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांचा आदर करणे, घरातील निर्णयांमध्ये त्यांना सहभागी करून घेणे आणि नातवंडांशी त्यांचा संवाद वाढवणे या साध्या गोष्टी त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. एखादा वृद्ध अचानक भीतीयुक्त वागत असेल, वजन कमी झाले असेल, वारंवार जखमा होत असतील किंवा आर्थिक व्यवहारांमध्ये संशयास्पद बदल दिसत असतील, तर त्यामागे अत्याचार असण्याची शक्यता विचारात घेऊन योग्य ती मदत करावी. ज्येष्ठांचा सन्मान हीच खरी भारतीय संस्कृती आणि त्यांचे संरक्षण हीच आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# केनवडचा हक्क हिरावून घेऊ देणार नाही!

## अपर तहसील कार्यालय अन्यत्र हलविण्याच्या प्रयत्नांविरोधात बेमुदत साखळी उपोषण सुरू; लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन कायम







**दैनिक आपला विदर्भ**

**केनवड। प्रतिनिधी** : शासनाने मंजूर केलेले प्रस्तावित अपर तहसील कार्यालय केनवड येथेच सुरू करण्यात यावे, तसेच ते अन्यत्र हलविण्याचे प्रयत्न तात्काळ थांबवावेत, या मागणीसाठी केनवड येथे मंगळवारपासून बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे. लेखी व समाधानकारक आश्र्वासन मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

मारुती महाराज संस्थानच्या सभागृहात सकाळी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून आंदोलनाची सुरुवात झाली. या आंदोलनात ग्रामस्थ, शेतकरी, महिला, युवक, व्यापारी तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलकांनी शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत, केनवडचा हक्क कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेऊ देणार नाही, असा निर्धार व्यक्त केला. हा संघर्ष कोणत्याही गावाविरोधात नसून नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वक्त्यांनी सांगितले की, वाशिम जिल्ह्यात केनवड, अनसिंग आणि कामरगाव येथे अपर तहसील कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. केनवड हे राष्ट्रीय महामार्गालगतचे महत्त्वाचे केंद्र असून येथे बँका, शासकीय व पशुवैद्यकीय दवाखाने, महावितरण कार्यालय, पोस्ट ऑफिस, सेतू सुविधा केंद्र, तलाठी भवन, कृषी सेवा केंद्र, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, बसस्थानक, व्यापारी प्रतिष्ठाने आदी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत.

सध्या परिसरातील २० ते २५ गावांतील नागरिकांना महसुली कामांसाठी रिसोडपर्यंत ३५ ते ४० किलोमीटरचा प्रवास करावा लागत असल्याने वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले.

प्रशासनाने मंजूर केलेले अपर तहसील कार्यालय केनवड येथेच सुरू करावे. कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडून कार्यालय अन्यत्र हलविण्याचा निर्णय घेतल्यास व्यापक लोकआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला. केनवडच्या हक्कासाठीचा हा लढा मागे घेतला जाणार नाही. शासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे!!

## ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशांनी घडवले महाराष्ट्रातील जलनियोजनाचे नवे पर्व




प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System - GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे.

एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches - CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे.



आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो. नदी-नाले, ओघोळ, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, गावांच्या सीमा, गट क्रमांक, भूजल पुनर्भरणाची क्षमता आणि जलसंधारणाच्या उपचारांची योग्य ठिकाणे यांची माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. या परिवर्तनामागे आहे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC:PMKSY 2.0) अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उभारलेली आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (GIS). या उपक्रमाचे सर्वात मोठे यश केवळ GIS तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर महाराष्ट्रातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट (Micro Watershed) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे, ही या उपक्रमाची ऐतिहासिक कामगिरी आहे. शासनाच्या तांत्रिक दालनात मर्यादित असलेली माहिती आज प्रत्येक शेतकरी, ग्रामपंचायत, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकापर्यंत पोहोचली आहे. ही केवळ डिजिटल सेवा नाही; तर जलसंधारणाच्या ज्ञानाचे लोकशाहीकरण आहे.

**जलसंधारणासमोरील वाढती आव्हाने**

महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. कोकणातील मुसळधार पाऊस, विदर्भातील उष्ण हवामान, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा..प्रत्येक भागाची जलस्थिती वेगळी आहे. परंतु या सर्व भागांना एकच समान आव्हान आहे, ते म्हणजे पावसाचे पाणी अधिकाधिक प्रमाणात जमिनीत मुरविणे आणि भविष्यासाठी साठवणे.

हवामान बदलामुळे पावसाचा कालावधी कमी होत आहे, तर अल्पावधीत अतिवृष्टीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याचबरोबर मृदा धूप वाढते, भूजल पातळी घटते आणि शेतीची उत्पादकता कमी होते. अशा परिस्थितीत प्रत्येक थेंबाचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे. यासाठी केवळ जलसंधारणाची कामे करणे पुरेसे नसते; तर योग्य ठिकाणी, योग्य प्रकारचा आणि योग्य प्रमाणात उपचार करणे आवश्यक असते. हे काम अंदाजावर नव्हे, तर अचूक माहितीच्या आधारेच शक्य होते.

**अंदाजावरून विज्ञानाकडे जलनियोजनातील डिजिटल झेप**

काही वर्षांपूर्वी पाणलोट विकासाचे नियोजन करताना प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी, स्थानिक अनुभव आणि कागदी नकाशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असे. प्रत्येक विभागाकडे वेगवेगळी माहिती असल्याने सर्व माहिती एकत्र करून सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report - DPR) तयार करण्यासाठी मोठा कालावधी लागत असे. काही ठिकाणी एकाच प्रकारची कामे पुन्हा प्रस्तावित होत, तर काही भाग आवश्यक उपचारांपासून वंचित राहत असे.

आज GIS प्रणालीमुळे हे चित्र बदलले आहे. उपग्रह प्रतिमा, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, GPS आधारित सर्वेक्षण, मृदेची माहिती, पर्जन्यमान, भू-आकृती, जलप्रवाह, भूजल आणि इतर विविध माहितीचे स्तर (Layers) एकत्र करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. परिणामी निर्णय प्रक्रियेला डेटा आणि विज्ञानाचा भक्कम आधार मिळाला आहे. याच कारणामुळे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० मध्ये GIS bm Digital Brain असे संबोधले जाते. कारण ही प्रणाली केवळ नकाशे तयार करत नाही; तर संपूर्ण पाणलोट विकासासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करते.

**महाराष्ट्राची डिजिटल जलसंपत्ती : ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे**

या संपूर्ण उपक्रमातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे (Micro Watershed Maps) तयार करून ते विनामूल्य सार्वजनिक वापरासाठी यंत्रणेच्या VSINA या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. ही केवळ आकड्यांची नोंद नाही; तर राज्याच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचा डिजिटल पाया आहे.

आज कोणताही नागरिक आपल्या गावाचा सूक्ष्म पाणलोट नकाशा https://mhvslna.org/ या संकेतस्थळावर पाहू शकतो, डाउनलोड करू शकतो आणि त्याची प्रिंटही घेऊ शकतो. पूर्वी केवळ तज्ज्ञ आणि शासकीय यंत्रणांपुरती मर्यादित असलेली माहिती आता लोकांच्या हातात आली आहे. यामुळे शासनाची माहिती अधिक पारदर्शक झाली आहे, तसेच नागरिकांच्या सहभागालाही नवी दिशा मिळाली आहे. पाणलोट विकास हा केवळ सरकारी कार्यक्रम न राहता, लोकसहभागातून उभा राहणारा विकासाचा पाया बनू लागला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आमदार सिद्धार्थ खरात यांचा मुख्यमंत्र्यांना थेट इशारा

## उपवर्गीकरणाचा निर्णय घेतलात तर होणाऱ्या परिणामांना सामोरे जावे लागेल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी : अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रियेच्या विरोधात बुधवारी बुलढाण्यात जिल्हास्तरीय भव्य सामाजिक ऐक्य महामोर्चा काढण्यात आला. जिल्हाभरातून हजारो नागरिक, महिला, युवक आणि विविध आंबेडकरवादी सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले. निळ्या झेंड्यांनी, जय भीम, जय संविधानच्या घोषणांनी आणि सामाजिक ऐक्याच्या संदेशाने संपूर्ण बुलढाणा दुमदुमून गेला.**





या महामोर्चाचे नेतृत्व मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शेकडो वाहनांचा भव्य ताफा मोर्चात सहभागी झाला. डिफेंडर वाहनातून झालेल्या त्यांच्या दमदार आगमनाने उपस्थितांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.

या मोर्चा व जाहीर सभेला रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, भीमशक्ती संघटनेचे अध्यक्ष तथा खासदार चंद्रकांत हंडोरे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे (कवाडे गट) आमदार सिद्धार्थ खरात. अध्यक्ष माजी आमदार जोगेंद्र कवाडे, प्रदेशाध्यक्ष भानुदास विसावे, अ‍ॅड. अमन आंबेडकर, अ‍ॅड. सूर्यवंशी, पँथर संघटनेचे दीपक केदार यांच्यासह विविध आंबेडकरवादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती, बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

सभेला संबोधित करताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत इशारा दिला की, अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय घेतलात तर त्याच्या परिणामांना सरकारला सामोरे जावे लागेल. अनुसूचित जातींचे सामाजिक ऐक्य तोडण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही यशस्वी होऊ देणार नाही.

खरात म्हणाले की, अनुसूचित जातीतील २९ पैकी २७ आमदारांनी एकमताने निवेदन देत या विषयावर विधानसभेत चर्चा करण्याची मागणी केली होती. मात्र सरकारने चर्चा टाळून जनभावनांकडे दुर्लक्ष केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून राज्य सरकार घाईघाईने उपवर्गीकरणाची प्रक्रिया राबवत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारचा हेतू सामाजिक न्याय नसून अनुसूचित जातींमध्ये फूट पाडून राजकीय लाभ मिळवण्याचा असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी स्पष्ट केले की, आमचे सामाजिक ऐक्य कोणत्याही परिस्थितीत तुटू देणार नाही. न्याय आणि समतेची लढाई आम्ही रस्त्यावरही लढू आणि विधानमंडळातही लढू. यावेळी त्यांनी अनुसूचित जाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी रिक्त शासकीय पदे तातडीने भरणे, अनुशेष (बॅकलॉग) भरती पूर्ण करणे, कंत्राटी भरती रद्द करणे, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृहे व कौशल्य विकास योजनांचा विस्तार करणे, महामंडळांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक कुटुंबाला रोजगार किंवा व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

संघर्ष समितीच्या निवेदनात भारतीय संविधानातील कलम १४, १५, १६ आणि ३४१ चा उल्लेख करत अनुसूचित जाती हा एकसंध घटनात्मक वर्ग असल्याचे नमूद करण्यात आले. उपवर्गीकरणामुळे संविधानातील समता, सामाजिक न्याय आणि बंधुता या मूल्यांना धक्का बसेल, असा दावा करण्यात आला. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी माजी न्यायमूर्ती अनंत बदर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करून समिती रद्द करावी. अनुसूचित जातींची जातनिहाय सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचे व्यापक सर्वेक्षण करून अहवाल प्रसिद्ध करावा. शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्व अनुशेष पदे तातडीने भरावीत.विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृहे, कौशल्य विकास व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाच्या सुविधा वाढवाव्यात.कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित घटकांशी व्यापक चर्चा करून संविधानिक हक्कांचे संरक्षण करावे. निवेदनात, अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण रद्द झाले नाही तर राज्यभर हा संघर्ष आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

सभेच्या शेवटी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है...या ओळी उच्चारत उपस्थित जनसमुदायाला संघर्षासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. जय भीम, जय संविधानच्या घोषणांनी सभेची सांगता झाली.

बुलढाण्यात झालेल्या या अभूतपूर्व सामाजिक ऐक्य महामोर्चामुळे अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला असून, राज्यभर या आंदोलनाची चर्चा सुरू झाली आहे.

## बॉलीवूड अभिनेत्री सायबर क्राईमची शिकार; अवघ्या काही मिनिटात बँक खाते झाले रिकामे

**मुंबई । प्रतिनिधी :** बॉलिवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्री सोबत सायबर फसवणूक मनोरंजन विश्वातून एक सायबर फ्रॉड संबंधी धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रसिध्द अभिनेत्री आणि निर्माती कीर्ती कुल्हारी हिची सायबर फसवणूक करून बँक खात्यातील पैसे चोरीला गेले आहेत. अज्ञात सायबर गुन्हेगारांनी तिच्या मोबाईल फोन आणि क्रेडिट कार्डची अनधिकृत माहिती मिळवून अवघ्या काही मिनिटांत २ लाख ४३ हजार ८५२ रुपये काढून घेतले. या प्रकरणी कीर्ति कुल्हारीने पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. कीर्ती कुल्हारीने नोंदवलेल्या तक्रारीनंतर अंबोली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कीर्ति कुल्हारी या वर्सोवा येथील यारी रोडवरील संगीता अपार्टमेंटमध्ये भाड्याने राहतात. २४ जुलै २०२६ रोजी रात्री ९:३० च्या सुमारास त्या अंधेरी पश्चिम `कडे असणाऱ्या सिनेपोलिस थिएटरमध्ये चित्रपट पाहत होत्या. त्याचवेळी त्यांच्या मोबाईलवर क्रेडिट कार्डवरून एअरोमेक्सिको एअरलाईन्ससाठी २,५२५ त्रब अमेरिकन डॉलर्स खर्च झाल्याचा अलर्ट संदेश आला.

कीर्ति कुल्हारीला परदेशातील संशयास्पद व्यवहाराचा मेसेज मिळताच त्यांनी तातडीने बँकेच्या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधला. बँकेच्या अधिकाऱ्यांनी तपास केल्यानंतर त्यांच्या क्रेडिट कार्डवरून परवानगीशिवाय चार वेगवेगळे मोठे व्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित क्रेडिट कार्ड तात्काळ ब्लॉक करण्यात आले.या प्रकरणी अंबोली पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगाराविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## जीव मुठीत धरून शिक्षणाची वाटचाल!

### गुडघाभर पाण्यातून नदी ओलांडत विद्यार्थ्यांचा शाळेचा प्रवास

### इगतपुरी तालुक्यातील इंदोरे भांगरेवाडीतील आदिवासी विद्यार्थ्यांची शाळावाट धोकादायक; पूल उभारण्याची ग्रामस्थांची पुन्हा मागणी



दैनिक आपला विदर्भ

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील इंदोरे भांगरेवाडी या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आजही जीव धोक्यात घालून शिक्षणासाठी जावे लागत आहे. गावाला जाण्यासाठी पक्का रस्ता किंवा पूल नसल्याने लहान मुलांना पालकांना कडेवर घेऊन, तर इतर विद्यार्थ्यांना हातात हात धरून गुडघाभर पाण्यातून कडवा नदी ओलांडावी लागत आहे. पावसाळ्यात हा प्रवास अधिकच धोकादायक बनत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कडवा नदीला पूर आला की सुमारे २०० लोकवस्ती असलेल्या या आदिवासी गावाचा शहराशी संपर्क पूर्णपणे तुटतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन तसेच अत्यावश्यक सेवांवरही गंभीर परिणाम होतो.

यापूर्वीही अशीच परिस्थिती निर्माण झाल्यानंतर ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी तसेच पंचायत समितीच्या लघुपाटबंधारे विभागाकडे कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असून त्यांनी पुन्हा एकदा तहसीलदारांकडे निवेदन देत कडवा नदीवर तातडीने पूल उभारावा किंवा पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. जीव धोक्यात घालून शिक्षण घ्यावे लागते, तरीही प्रशासनाने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करू नये, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## ऑलम्पिकवीर स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे दर्जेदार आयोजन करा - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

दैनिक आपला विदर्भ



**बीड । प्रतिनिधी :** क्रीडा क्षेत्र आणि खेळाडू हे दिवंगत अजितदादा पवार यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय होते. राज्यात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या याच विकासदृष्टीचा वारसा पुढे नेत बीड जिल्ह्यातील क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जिल्हा क्रीडा संकुलासाठी २५ कोटींच्या विकास आराखड्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, या कामांना गती देण्यात यावी, तसेच जिल्ह्यातील व्यायामशाळांना डीपीडीसीमधून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करावेत, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित जिल्हा क्रीडा संकुल समिती तसेच स्वर्गीय खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा आयोजन समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी, खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, दिवंगत अजितदादा पवार यांनी बीड दौऱ्यादरम्यान जिल्हा क्रीडा संकुलाला भेट देऊन खेळाडूंशी प्रत्यक्ष संवाद साधला होता. त्यांच्या मागण्या जाणून घेत जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासासाठी २५ कोटींच्या आराखड्यास मान्यता दिली होती. त्या निर्णयाला आता मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करून दर्जेदार क्रीडा सुविधा उभाराव्यात.

त्या पुढे म्हणाल्या की, बीड जिल्ह्याला क्रीडा क्षेत्राचा समृद्ध वारसा लाभला आहे. हा वारसा अधिक बळकट करण्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी आणि सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल. क्रीडा विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

बैठकीत जिल्ह्यातील व्यायामशाळांना डीपीडीसीमधून आर्थिक सहाय्य देण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या. प्राप्त प्रस्तावांची जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने छाननी करून आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी ऑलिम्पिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाचा मान बीड जिल्ह्याला मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, ही स्पर्धा राज्याच्या प्रतिष्ठेला साजेशी, शिस्तबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने आयोजित करण्यात यावी. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना निवास, भोजन, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि सरावासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच क्रीडारसिकांसाठीही योग्य नियोजन करण्यात यावे.

स्पर्धेच्या आयोजनात कोणत्याही प्रकारची त्रुटी राहता कामा नये. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजन तातडीने पूर्ण करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा । प्रतिनिधी :** राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती योजना जाहीर केली असून, या योजनेची तळागाळापर्यंत प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. कर्जबाजारीपणामुळे यापुढे राज्यात एकाही शेतकऱ्याची आत्महत्या होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

सहकार आणि महसूल विभागाच्या वतीने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्हाधिकाऱ्यांसोबत संवाद साधण्यात आला. यावेळी ते बोलत होते. बैठकीला सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण, विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली आहे. कोणताही पात्र कर्जदार शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. या योजनेत प्रामुख्याने कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना आणि प्रोत्साहनपर लाभ अशा तीन घटकांचा समावेश आहे. यातून राज्यातील सुमारे ३२ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा, तर नियमित कर्ज भरणाऱ्या २४ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ दिला जाणार आहे.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १७ लाख (१६.९६ लाख) कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांची ७.०३ लाख तर व्यापारी बँकांची ९.९३ लाख कर्जखाती आहेत. तर दुसरी यादीही लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेली थकबाकी रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवरील रक्कम यात काही ठिकाणी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत स्पष्टीकरण देताना प्रधान सचिव प्रवीण दराडे म्हणाले, अशी तफावत असल्यास योजनेच्या पोर्टलवरील ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची रक्कम ग्राह्य धरण्यात यावी. तसेच, १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज न आकारण्याच्या शासनाच्या सूचनांना सर्व बँकांनी लेखी संमती दिली आहे.

कर्जमुक्तीची प्रक्रिया: पोर्टलवर दिसणारी रक्कम मान्य असल्यास शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण करावे. प्रमाणीकरण यशस्वी झाल्यावर त्यांना कर्जमुक्तीच्या रकमेची माहिती असलेली पावती मिळेल. त्यानंतर ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या कर्जबाकीच्या लाभाची रक्कम डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाईल. कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यास कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येईल. यानंतर या सर्व शेतकऱ्यांना बँकेमार्फत आगामी खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्जाची उपलब्धता होईल. कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या बँकांच्या शाखा आणि विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये लावल्या जातील.

तक्रार निवारणासाठी जिल्हास्तरीय समिती: जर एखाद्या शेतकऱ्याला पोर्टलवरील रक्कम किंवा कर्जाबाबतचा इतर कोणताही तपशील अमान्य असेल, तर तो पोर्टलवरच आपली तक्रार नोंदवू शकतो. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी थेट जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती काम पाहणार आहे.

विशेष सवलत (हेअर कट): शेतकऱ्यांचे कर्जखाते अनुत्पादित (एनपीए) झाले असल्यास, बँकांना थकीत कालावधीच्या टप्प्यानुसार विशेष सवलत (हेअर कट) दिली जाणार आहे. त्याची तडजोड रक्कम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. अनुत्पादक कर्जाचा दिनांक व तडजोडीची रक्कम अनुक्रमे – ३०/०९/२०२१ किंवा त्यापूर्वी – कर्जबाकीच्या ३५ टक्के, ०१/१०/२०२१ ते ३०/०९/२०२२ – कर्जबाकीच्या ४५ टक्के, दि. ०१/१०/२०२२ ते ३०/०९/२०२३ – कर्जबाकीच्या ५५ टक्के, ०१/१०/२०२३ ते ३०/०९/२०२४ – कर्जबाकीच्या ७० टक्के आणि ०१/१०/२०२४ ते ३०/०९/२०२५ या कालावधीत कर्जबाकीच्या ८५ टक्के प्रमाणे सवलत दिली जाईल.

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांची नावे जाहीर झालेल्या यादीत नाहीत, त्यांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले.

## वृत्तविशेष...

### राज्य पुरस्कृत योजनेतून शेतकऱ्यांना परदेश अभ्यास दौऱ्याची संधी; १७ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**बुलढाणा । प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना युरोप व चीनसह विविध देशांतील आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा लाभ व्हावा, यासाठी अभ्यास दौऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. १७ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक शेती, पीक उत्पादकता वाढ, सेंद्रिय शेती, फलोत्पादन, दुग्धव्यवसाय, कृषी यांत्रिकीकरण, कृषी प्रक्रिया, निर्यात संधी आणि कृषी बाजार व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा आहे. योजनेसाठी अर्ज करणारा लाभार्थी स्वतः शेतकरी असणे आवश्यक असून त्याच्याकडे ॲग्रीस्टॅक ऋीशी खऊ, वैध पासपोर्ट आणि आधार कार्ड असणे बंधनकारक आहे. तसेच अर्जदाराचे वय किमान २५ वर्षे असावे, तो शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा आणि यापूर्वी शासनाच्या आर्थिक सहाय्याने परदेश अभ्यास दौरा केलेला नसावा.

या योजनेअंतर्गत शासनाकडून अभ्यास दौऱ्याच्या एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल २ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येणार असून उर्वरित खर्च संबंधित शेतकऱ्याने करावयाचा आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावा. प्राप्त प्रस्तावांची जिल्हास्तरावर छाननी करून आवश्यकतेनुसार सोडत पद्धतीने निवड करण्यात येईल, तर अंतिम निवड राज्यस्तरीय समितीमार्फत केली जाईल. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

### महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या येईल भेटीला, अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी दिली माहिती

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी।प्रतिनिधी :** बहुचर्चित आगामी चित्रपट 'महाराष्ट्राची एप्स्टाईन फाईल' या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले आहे. हा चित्रपट येत्या २ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे अशी माहिती अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी शिर्डीत माध्यमांशी बोलताना दिली आहे. चित्रपटाचे काम वेगानं पूर्ण झाले असून पुढील महिन्यात हा चित्रपट सेन्सॉर बोर्डाकडे मंजुरीसाठी पाठवला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं.अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतलं. यावेळी साईबाबा संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांनी शाल आणि साईप्रसाद देऊन सय्यद यांचा सत्कार केला. साईदर्शनानंतर माध्यमांशी बोलताना दीपाली सय्यद यांनी त्यांच्या आगामी 'महाराष्ट्राची एप्स्टाईन फाईल' या चित्रपटाबाबत होत असलेल्या आक्षेपांवर भाष्य केलं.

त्या म्हणाल्या , एखादी कलाकृती जेव्हा लोकांसमोर आणली जाते आणि त्यातून काहीतरी चांगले ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हा त्यावर रुपाली चाकणकर यांनी आक्षेप घेण्याचे काहीच कारण नव्हते. ज्या पदावर पूर्वी काम केले आहे. त्या पदावर असताना अशा प्रयत्नांना पाठिंबाच मिळायला हवा होता. त्यामुळं चित्रपटावर घेतलेले आक्षेप हे बाळबोध आणि निरर्थक आहेत.

'महाराष्ट्राची एप्स्टाईन फाईल' या चित्रपटाची कथा आणि त्यातील पात्रांविषयी विचारले असता त्यांनी थेट उत्तर देणे टाळत प्रेक्षकांना थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहण्याचे आवाहन केले. अभिनेत्री दीपाली सय्यद म्हणाल्या, चित्रपटाच्या सुरुवातीलाच कलाकृती काल्पनिक असल्याचे नमूद केलेले असते. याआधीही वास्तव घटनांवर आधारित अनेक चित्रपट येऊन गेले आहेत. चित्रपटात कोणाची काय भूमिका आहे, हे चित्रपट पाहिल्यावरच स्पष्ट होईल.

## जानेफळ पोलिसांची धाड; देऊळगाव साकर्षा येथे कथित गोमांस विक्रीचा भंडाफोड





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील जानेफळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देऊळगाव साकर्षा येथे गुरुवारी (३० जुलै) पहाटे पोलिसांनी टाकलेल्या धाडीत कथित गोवंश हत्या व गोमांस विक्री प्रकरणाचा पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी दोन आरोपींना अटक करत सुमारे १ क्विंटल २६ किलो कथित गोमांस, तसेच चाकू, सुरे आणि मांस कापण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पहाटे साडेचारच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. धाडीदरम्यान घटनास्थळावरून एकूण ४३ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई जानेफळ पोलीस ठाण्याचे ठाणेदार शरद माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जाधव व त्यांच्या पथकाने केली. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास जानेफळ पोलीस करत आहेत.

या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून अवैध मांसविक्रीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे.

## एकही पात्र शेतकरी १०० टक्के कर्जमाफीपासून वंचित राहणार नाही

**मुंबई। प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील एकाही पात्र शेतकऱ्याला कर्जमाफीच्या लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही. कर्जमाफीची दुसरी यादी तयार झाली असून ऑगस्ट महिन्यात १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध केली जातील, अशी घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी केली. तसेच बँकांच्या 'हेअरकट' (आर्थिक तडजोड) मुद्यावरून शेतकऱ्यांनी अजिबात घाबरण्याचे कारण नाही, असे स्पष्ट करत राज्य सरकार आणि बँकांमधील या प्रक्रियेचा शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पाच जिल्ह्यांतील १६ लाख ९६ हजार शेतकरी खात्यांची दुसरी यादी तयार करण्यात आली असून सर्व माहिती महाआयटी पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. सर्व पात्र शेतकऱ्यांना 'युनिक आयडी' देण्यात आला आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत कर्जमाफीची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाईल, असे कृषिमंत्र्यांनी सांगितले.कर्जमाफीच्या अंमलबजावणीदरम्यान बँकांकडून 'हेअरकट'च्या नावाखाली अडून बसण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या. यावर स्पष्टीकरण देताना कृषिमंत्र्यांनी सांगितले की, 'हेअरकट' म्हणजे थकीत कर्जाचा किती वाटा राज्य सरकार उचलणार आणि किती हिस्सा बँक सोडून देणार, याबाबतची राज्य सरकार आणि बँकांमधील अंतर्गत आर्थिक तडजोड आहे. १ वर्षापर्यंत थकीत कर्जावर सरकार ८५ टक्के तर बँक १५ टक्के बोजा सहन करते; तर ४ वर्षांपेक्षा जास्त जुन्या थकीत कर्जावर सरकार ३५ टक्के आणि बँका ६५ टक्के वाटा उचलतात. या सूत्राचा शेतकऱ्यांच्या मूळ कर्जमाफीवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही आणि त्यांना १०० टक्के कर्जमाफी मिळेल. राज्यभरातील एकूण ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचे सरकारचे ध्येय असून या योजनेसाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## बुलढाण्यात विवाहपूर्व समुपदेशन केंद्र सुरू होणार

**– ७ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन**
**– स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविले**

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** राष्ट्रीय महिला आयोगाच्या (NCW) मार्गदर्शनाखाली बुलढाणा जिल्ह्यात विवाहपूर्व संवाद (Pre-Marital Counseling Center) केंद्र सुरू करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने केंद्र चालविण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशक उपलब्ध करून विनामूल्य सेवा देण्यास इच्छुक स्वयंसेवी संस्थांकडून दि. ७ ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

विवाहपूर्व समुपदेशन, कौटुंबिक संवाद आणि मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

वाढत्या कौटुंबिक वाद-विवादांना आळा घालणे, विवाहपूर्व परस्पर संवादाला प्रोत्साहन देणे तसेच सुदृढ व समंजस कौटुंबिक जीवनाची पायाभरणी करणे, हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे. या केंद्रामार्फत विवाहेच्छुक युवक-युवती तसेच नवविवाहित जोडप्यांना तज्ज्ञांकडून विनामूल्य समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

केंद्रासाठी आवश्यक जागा व मूलभूत साहित्य जिल्हा प्रशासनामार्फत उपलब्ध करून दिले जाणार असून, प्रशिक्षित समुपदेशक किंवा मानसोपचारतज्ज्ञ स्वयंसेवी संस्थांनी उपलब्ध करून द्यावेत.

अर्ज करणाऱ्या संस्थांची निती आयोगाच्या पोर्टलवर आवश्यक नोंदणी तसेच इतर वैध नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेकडे प्रशिक्षित व अनुभवी समुपदेशक अथवा मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध असावेत आणि कौटुंबिक, सामाजिक किंवा महिला सक्षमीकरण क्षेत्रात कामाचा अनुभव असावा.

इच्छुक स्वयंसेवी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दि. ७ ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जोशी डोळे यांच्या दवाखान्याजवळ, मुठे ले-आऊट, बुलढाणा येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## NCMC स्मार्ट कार्डसाठी आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ
## ज्येष्ठ नागरिक व महिलांची गैरसोय टाळण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :**


एसटी प्रवासात राज्य सरकारच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी अनिवार्य करण्यात आलेल्या छउचउ (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्डच्या अंमलबजावणीला आता १ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक पात्र ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप कार्ड मिळालेले नसल्याने त्यांची प्रवास सवलतीपासून गैरसोय होऊ नये, यासाठी हा दिलासादायक निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (MSRTC) अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.


राज्य शासनाच्या वतीने 'अमृत ज्येष्ठ नागरिकांना' मोफत प्रवास, तर ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना एसटी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानावर आधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला होता. परंतु, राज्यातील हजारो पात्र प्रवाशांनी नोंदणी केली असली तरी तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणांमुळे काहींना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्यामुळे कोणताही पात्र प्रवासी सवलतीपासून वंचित राहू नये, याची दखल घेत प्रशासनाने हा मुदतवाढीचा निर्णय घेतला आहे.

एसटीची प्रवासी सवलत ही सर्वसामान्यांच्या सोयीसाठी आहे. तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणांमुळे कोणत्याही पात्र ज्येष्ठ नागरिक अथवा महिला प्रवाशाची गैरसोय होऊ नये, ही आमची भूमिका आहे. म्हणूनच NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या अंमलबजावणीला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या मुदतवाढीमुळे स्मार्ट कार्ड न मिळालेल्या हजारो अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, पात्र प्रवाशांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन NCMC स्मार्ट कार्ड मिळवण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले.

## राज्यस्तरीय दक्षता पथकाची धडक कारवाई; ८६ लाखांचा मुद्देमाल जप्त, एक ताब्यात







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने बुलढाणा जिल्ह्यात अवैध गॅस रिफिलिंग व गॅस चोरीच्या रॅकेटवर मोठी कारवाई करत तब्बल ८६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, काही संशयित फरार झाले आहेत.

ही कारवाई खामगाव-अकोला राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल सुदर्शन शेजारी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली. दक्षता पथकाने अचानक धाड टाकली असता मोठ्या गॅस कॅप्सूल टँकरमधून बेकायदेशीररीत्या गॅस काढून तो लहान टँकर आणि सिलेंडरमध्ये भरला जात असल्याचे आढळून आले. हा गॅस काळ्या बाजारात विक्रीसाठी पाठविण्याची तयारी सुरू असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

कारवाईदरम्यान गॅस टँकर, लहान टँकर, ११ गॅस सिलेंडर तसेच इतर साहित्य असा सुमारे ८६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळावरून एका आरोपीला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, फरार झालेल्या इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

या कारवाईबाबत मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे आणि सहाय्यक नियंत्रक प्रदीप काळे यांनी माहिती देत, अवैध गॅस साठवण, रिफिलिंग व काळाबाजाराविरोधातील कारवाया यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.